श्री.साक्षात रणजीत सारवान, यांना वारसा हक्काने सफाई कामगार वर्ग-४ या पदावर नियुक्ती देणे बाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
आरोग्य विभाग
जिल्हा परिषद आदेश क्र.आरोग्य/आस्था-३/ ८५७ /२०२५
दिनांक - २८/०९/२०२५

वाचा :-१) महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम १९६७ तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) (सुधारणा) नियम २००३

२) वैदयकीय अधिकार, प्रा.आ.केंद्र- सोनई, ता.नेवासा यांचे कडील पत्र जा.क्र.वशि/आस्था/२६७/२०२३ दिनांक-२६/०७/२०२३ अन्वये श्री.साक्षात रणजीत सारवान, यांचा दिनांक-२४/०७/२०२३ रोजीचा अर्ज

३) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे कडील शासन निर्णय क्रमांक. सफाई-२०१८/प्र.क्र.४६/सआक दिनांक :- २४ फेब्रुवारी, २०२३

४) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे कडील शासन निर्णय क्रमांक. सफाई-२०२४/प्र.क्र.७०/सआक दिनांक :- १३ ऑक्टोबर, २०२४

अहिल्यानगर जिल्हा परिषदेमध्ये मयत कै.रणजीत किसन सारवान, सफाई कामगार, हे प्राथमिक आरोग्य केंद्र-सोनई, ता.नेवासा येथे कार्यरत असताना दिनांक- ०५/०१/२०२३ रोजी मयत झाले आहेत. शासन संदर्भ क्र.३ अन्वये लाड पागे समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने सफाई कामगारांच्या वारसा हक्काच्या अंमलबजावणीबाबत सुधारीत तरतुदीनुसार वारसा हक्काने पात्र ठरणारे सफाई कामगाराचे वारस मधील ३.२ मध्ये मुलगा/मुलगी असा उल्लेख आहे.

श्री.साक्षात रणजीत सारवान, यांनी वरील संदर्भ क्रमांक २ अन्वये मयत कै.रणजीत किसन सारवान, सफाई कामगार हे मयत झाल्याने वारसहक्काने सफाई कामगार, वर्ग-४ पदावर नोकरी मिळणेबाबतचा अर्ज या कार्यालयास सादर केलेला होता.

त्यानुसार श्री.साक्षात रणजीत सारवान, हे संदर्भ क्रमांक ३ मधील तरतुदीनुसार सफाई कामगार वर्ग-४ पदावर खालील तक्त्यात नमुद उमेदवारास वारसा हक्काने सफाई कामगार वर्ग-४ या पदावर वेतन संरचना S-1 : रूपये १५००० - ४७६०० मध्ये त्यांच्या नावासमोर नमुद केलेल्या ठिकाणी खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन तात्पुरत्या स्वरुपात नेमणुक करण्यात येत आहे.

| अ.क्र. | उमेदरवाराचे नाव | पत्ता | पदस्थानेचे ठिकाण | निवड प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्री.साक्षात रणजीत सारवान, | मु.पो.सोनई, ता.नेवासा, जि.अहिल्यानगर, पिन कोड क्र. ४१४१०५ | प्रा.आ.केंद्र कुकाणा ता.नेवासा. | अनुसूचित जाती |

नेमणुकीच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे राहतील.

१. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम १९६७ च्या नियम ६ (५) नुसार जिल्हा सेवेतील कोणत्याही पदांवर नामनिर्देशीत करुन नेमण्यात आलेल्या उमेदवारांस एक वर्षाच्या मुदतीसाठी परिवीक्षाधिन म्हणुन ठेवण्यात येईल.अशा नियुक्ती करण्यात आलेल्या उमेदवारांचे काम आवश्यक त्या दर्जाचे नसल्यास अशा उमेदवारांचा परिविक्षाधीन कालावधी वाढविण्यात येईल.

२. जिल्हा सेवा वर्ग ४ सफाई कामगार गट-ड या पदावर देणेत आलेली नेमणुक निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात देणेत आलेली असून तात्पुरत्या स्वरुपात असलेल्या कोणत्याही पदाची मुदत संपल्यानंतर व कोणतेही पद संपुष्ठात आलेनंतर देणेत आलेली नेमणुक कोणतीही पुर्वसुचना न देता संपुष्टात आणण्यात येईल. तसेच सदर नेमणुकीमुळे त्यांना यापुढे शासकीय नेमणुकीसाठी कोणताही हक्क प्रस्थापित करता येणार नाही.

३. उमेदवाराची नेमणुक ही तात्पुरत्या स्वरुपाची आहे.

४. रुजू होतेवेळी भारतीय घटनेतील तरतुदीनुसार भारतीय संघराज्याशी एकनिष्ठ राहणेबाबत शपथ घ्यावी लागेल.ती शपथ सक्षम अधिका-याने स्वाक्षांकित करुन कर्मचा-यांच्या मुळसेवापुस्तकांमध्ये डकविणेत यावी.

५. उमेदवारांस महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती ) नियम १९८१ मधील तरतुदीनुसार सदर पदावर रुजू झालेच्या दिनांकापासून तीन महिन्याचे आत जिल्हा शल्य चिकित्सक, अहमदनगर यांचेकडील शारिरिक दृष्टया पात्रतेसंबंधीचे प्रमाण पत्र हजर केले पाहिजे.

६. नेमणुकीच्या ठिकाणी रूजू होण्यापुर्वी कोणत्याही प्रकारचे भत्ते देय राहणार नाहीत.

७. सदर पदावर रूजू झालेनंतर जर काही अपरिहार्य कारणारतव नोकरीचा राजीनामा देणेपुर्वी एक महिना आगावू नोटिस दयावी लागेल.किंवा एक महिन्याचा मुळ वेतनाची रक्कम जिल्हा निधीत भरावी लागेल.

८. नेमणुक दिल्यानंतर हजर करून घेणेपुर्वी वरिल अनुक्रमांक २ मधील अटीबाबत नोंद घेतलेसंबंधी कार्यालयप्रमुख यांनी त्यांचेकडील लेखी प्रतिज्ञापत्र भरुन घ्यावे.

९. या आदेशानुसार नियुक्तीच्या ठिकाणी हजर झालेनंतर किमान ५ वर्ष आंतर जिल्हा बदलीचा विचार केला जाणार नाही.

१०.सदर आदेश मिळालेपासून ३० दिवसाचे आंत नेमणुकीच्या ठिकाणी हजर व्हावे. मुदतीत हजर न झाल्यास नोकरीची गरज नाही, असे गृहीत धरुन नियुक्ती आपोआप रद्द झालेचे समजणेत येईल. व विहीत कालावधीनंतर संबंधित उमेदवार यांचे प्राप्त लेखी तक्रारीचा हे कार्यालय विचार करणार नाही.

११.महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील क्रं. व्हीसीए/१०९३/१४९९/प्र क्र.-५९/१६ अ दिनांक ९/३/९४ मधील सुचनेनुसार त्यांचे चरित्र व पुर्वचारित्र्य तपासामध्ये चांगले असणेचे अटीस अधिन राहुन नियुक्ती देणेत येत आहे. यामध्ये एखादी गंभीर बाब निदर्शनास आल्यास सेवा संपुष्टात आणण्यात येईल.

१२.सदरची नेमणुक ही शासन निर्णयातील तसेच याबाबत वेळोवेळी निर्गत केलेल्या आदेशातील अटीस अधिन राहून देणेत येत आहे.

१३.कार्यालयात सदर प्रकरणी देणेत आलेली माहिती, प्रतिज्ञापत्रे यातील मजकुर असत्य असल्याचे निदर्शनास आल्यास सदरची नेमणुक ही रद्द करणेत येईल व असत्य प्रतिज्ञापत्र करून दिल्याबाबत संबंधीतांविरुध्द नियमानुसार कारवाई करणेत येईल.

१४.तुम्ही विवाहीत असल्यास तुम्हांस एक पत्नी आहे असे समजणेत येत आहे. एकापेक्षा जास्त पत्नी असल्याचे आढळुन आल्यास तुमची सेवा समाप्त करणेत येईल.

१५.कामावर रूजू होतेवेळी सेवायोजन कार्यालय, समाजकल्याण कार्यालयाचे नोंदणीपत्र, शैक्षणिक अर्हता धारण केलेचे प्रमाणपत्र, जन्मतारीख दाखला, मागासवर्गीय असल्यास त्यासंबंधी संबंधीत तहसीलदार यांचे जातीचे प्रमाणपत्र,जात पडताळणी समितीकडून जातीचे प्रमाणपत्र तपासून घेतल्याबाबतचे वैधता प्रमाणपत्र,चांगल्या वर्तणुकीचे प्रमाणपत्र सादर करणे जरुरीचे आहे. (या प्रमाणपत्राची एक-एक प्रत कार्यालयीन दप्तरी ठेवण्यात येईल.मुळ प्रती पडताळून परत करण्यात येतील.)

१६.जिल्हा परिषद सेवेत असताना, अगर रजेच्या मुदतीत कोणताही व्यवसाय, धंदा, अगर इतरत्र नोकरी करता येणार नाही.

१७.खात्याच्या पुर्व परवानगी शिवाय प्रशिक्षण घेता येणार नाही.

१८.कार्यालयीन प्रमुखांना खालील नामनिर्देशन पत्र देण्यात यावी.

१. गटविमा योजना, २.जातीचा दाखला, ३. वैदयकीय दाखला, ४.जातीचे वैधता प्रमाणपत्र ५. स्वग्राम घोषणापत्र ६. शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र, ७.लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र

उपरोक्त अ.क्र.१ ते ७ बाबी कार्यालयास उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबंधित उमेदवार यांची राहील.सेवा पुस्तक भरताना उपरोक्त कागदपत्रे डकविण्यात यावी. ती डकविण्यात आली आहे किंवा नाही यांची स्वतः खात्री करुन घ्यावी.

१९.दिनांक ३१ ऑक्टोबर २००५ रोजीच्या शासन निर्णयानुसार दिनांक १ नोव्हेंबर २००५ किंवा त्यानंतर त्यांची शासकीय सेवेत नियुक्ती होताच त्यांना नविन परिभाषिक अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू ठरेल.मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती योजना (म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती वेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन अंशराशीकरण नियम १९८४) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही.

२०.हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे आपणास सफाई कामगार गट- ड पदास अपात्र ठरविण्यात येईल.

२१.नियुक्तीनंतर सेवा पुस्तकांत जन्मतारखेची करणेत आलेली नोंद पाच वर्षानंतर बदलता येणार नाही. याबाबत संबंधित उमेदवारांने स्वतः कार्यालय प्रमुखांकडे स्वतः खात्री करावी विहीत वेळेनंतर याबाबत केलेल्या तक्रारीची हे कार्यालय जबाबदारी घेणार नाही.

२२.सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.१२/१२/२०११ मधील तरतुदीना अधिन राहुन सदरची नियुक्ती देणेत येत आहे.नियुक्ती मिळालेनंतर सहा महिन्यांच्या आत जातवैधता प्रमाणपत्र पडताळणी करुन जात वैधता प्रमाणपत्र कार्यालयप्रमुखांना सादर करण्याची दक्षता घ्यावी. जात वैधता प्रमाणपत्र विहीत वेळेत सादर न केल्यास अथवा जात वैधता प्रमाणपत्र अवैध ठरल्यास नियुक्ती आदेश रदद करण्यात येतील अशा उमेदवारांविरुध्द पडताळणीचे विनियमन-अधिनियम २००० मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल.

२३.शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्याकडील शासन निर्णय क्र.घभाभ /१००५ प्र.क्र.४६३/ पापु १६, दिनांक ८ जुन २००६ अन्वये शासकीय कर्मचारी व अधिकारी यांना शौचालयाचा वापर करणे अनिवार्य करण्यात आलेले आहे.त्यानुसार कार्यालयप्रमुखांना उमेदवार शौचालयाचा वापर करीत असलेबाबत प्रमाणपत्र घेण्यात यावे अन्यथा विहीत कालावधीनंतर सदर उमेदवारांचा घरभाडे भत्ता थांबविण्यात यावा.

२४.शौचालय बांधणे व शौचालयाचा वापर करणे उमेदवारांस बंधनकारक आहे.

२५.आरोग्य सेवा अत्यावश्यक सेवा असल्याने खात्यांच्या पुर्वपरवानगी शिवाय इतर अन्य अभ्यासक्रमांस बसता येणार नाही बसायचे असल्यास परवानगी घेवुनच बसावे लागेल.

२६.संबंधित उमेदवार यांना नियुक्तीचे ठिकाणी मुख्यालयी वास्तव्य करुन राहणे बंधनकारक आहे.

२७.उमेदवारांची नियुक्ती जिल्हा पोलिस अधिक्षक यांचेकडील चारित्र्य पडताळणी अहवालाचे अधिन राहील याबाबत अहवालात काही आक्षेपार्ह बाबी निर्दशनास आल्यास सदरची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

२८.नियुक्ती अधिका-यांच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही कार्यालयात बदलीस पात्र राहील.

२९.सदर आदेशाने नेमणुक दिल्यानंतर संबंधिताचे नियुक्तीबाबत कोणी आक्षेप घेतल्यास व प्राथमिक चौकशीअंती त्यात तथ्य दिसुन आल्यास अगर नेमणुकीच्या वेळी सादर केलेली माहिती चुकीची आढळुन आल्यास दिलेली नियुक्ती कोणत्याही टप्प्यांवर व कोणत्याही वेळी रद्द करण्यात येईल.

३०.उमेदवाराने खाली दिलेल्या नमुन्यात तहसिलदार यांचेकडील प्रतिज्ञापत्र भरुन ज्या कार्यालयास उमेदवारांची नियुक्ती करणेत आलेली आहे सदर कार्यालयप्रमुखांकडे प्रतिज्ञापत्र कार्यालयीन दप्तरी ठेवावे लागेल. "मी श्री/श्रीम. -----------------------------राहणार ------------- प्रतिज्ञापत्र लिहून देतो/देते की, जिल्हा परिषद सेवेत माझे जिल्हा सेवा वर्ग ४ सफाई कामगार गट ड या पदावर झालेली नियुक्ती ही सुधारीत वेतन संरचना S-1: रूपये १५००० - ४७६०० मध्ये पुर्णपणे हंगामी स्वरूपाची असून ती कोणतेही कारण अथवा नोटिस न देता संपुष्टात आणण्याचा जिल्हा परिषदेला पुर्ण अधिकार असून, त्याअटीवर मी ही नियुक्ती स्विकारीत आहे."

३१.नेमणुकीचे आदेश प्राप्त झालेपासून ३० दिवसाचे आंत शैक्षणिक पात्रता व जन्मतारीख व जातीचे प्रमाणपत्राच्या प्रती या कार्यालयास सादर करून वैदयकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र यांचेकडेस हजर होणेसाठी ना हरकत प्रमाणपत्र घेवूनच नेमणुकीच्या ठिकाणी हजर होणे आहे.मुदतीत हजर न झाल्यास निवड रद्द होईल. व आपल्या कोणत्याही अभिवेदनाचा विचार केला जाणार नाही.

३२.नियुक्ती मिळाले पासून सहा महिन्याचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल.
३३.कार्यालयीन कामी हजर होणेसाठी या आदेशातील अटी मान्य असलेबाबत लेखी निवेदन दयावे लागेल.
३४.वरील अ.क्र.१ ते ३३ अटी व शर्तीच्या अधिन राहुन उमेदवारांस नेमणुक देण्यात येत आहे

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला असुन त्यांचा संकेतांक 202509281002241 असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 28-09-2025 21:42:22

(आनंद भंडारी भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री.साक्षात रणजीत सारवान,
पत्ता - रा. मु.पो.सोनई, ता.नेवासा, जि.अहिल्यानगर, पिन कोड क्र. ४१४१०५

प्रतिलीपी माहितीसाठी व कार्यवाहीसाठी

१.वैदयकीय अधिकारी,प्राथमिक आरोग्य केंद्र कुकाणा, तालुका-नेवासा, जिल्हा अहिल्यानगर
२.गटविकास अधिकारी,पंचायत समिती नेवासा तालुका नेवासा जिल्हा अहिल्यानगर
३.तालुका आरोग्य अधिकारी,पंचायत समिती नेवासा तालुका नेवासा जिल्हा अहिल्यानगर
४.मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर
५.आस्थापना निवड नस्ती

स्वाक्षरी/-
(आनंद भंडारी भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर